# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०३/२०२०** **दिनांक १५.०२.२०२०**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शनिवार दिनांक १५/०२/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/४४५०/२०२०, दि.०७.०२.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार सदरहु सभा शनिवार दिनांक १५/०२/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.न्या.श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
२. मा.श्री.दी.म.मुगळीकर (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
३. मा.श्री.दिलीप स्वामी, अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४. मा.श्रीमती गीता प्रविण बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **मे.लेजर व्हिजन लि.हॉगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन कार्यवाही करणेकामी ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबत.**

**विषय नं.०२** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादनासाठी संस्थान निधीतून रु.१६३.५५ कोटी खर्चास व या रस्त्यांचे जमीन खरेदीसाठी दि.२५.०६.२०१८ रोजीचे शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेस मान्यतेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**विषय नं.०३** **साईगार्डन प्रकल्पाचे सिव्हील कामाचे ठेकेदार यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेबाबत.**

**विषय नं.०४** **मौजे पिंपळवाडी, ता.राहाता येथील जमीन गट नं.१६४/२ क्षेत्र ३.२९ हेक्टर, गट नं.२७९ क्षेत्र ०.०२ आर आणि गट नं.९/ड क्षेत्र २.४८ हेक्टर असे एकुण क्षेत्र ५.७९ हेक्टर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कायम खरेदी देणेबाबत श्री.विलास मोहनराव तुरकणे व इतर २ रा.पिंपळवाडी, ता.राहाता यांचा दि.०१.११.२०१९ रोजीचा अर्ज.**

**विषय नं.०५** **प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील वापरास दिलेली जमिन सर्व्हे नं.१४८ पै.मधील ११४.३२ चौ.मी.बांधीव व २६६.२८ चौ.मी.मोकळी जागा वापराचे मुदतीबाबत.**

**विषय नं.०६** **आर्थिक वर्ष २०२०-२०२१ करीता पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणूक करणेकामी संस्थानच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करणेबाबत.**

**विषय नं.०७** **आयकर विषयक मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय येथे Writ Petition, Special Leave Petition दाखल करणे व संस्थानची बाजू मांडणे इ.करीता विधिज्ञांचे पॅनल तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.८९** **उपरोक्त विषय नं.०१ ते ०७ या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.०८** **सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१९-२० चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे कामकाज सध्या मा. व्यवस्थापन मंडळ पहात आहे. अधिनियमातील कलम १७ अन्वये मा. व्य. मंडळाची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे : "(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तांकडे पाठवील." सदर तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे

आवश्यक आहे. सोबत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक, रुग्णालयासह तयार करण्यात आलेले असून त्यातील जमा-खर्चाच्या ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:

अ) I.संस्थान (रुग्णालये वगळुन) जमेचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)

| अं. क्र. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१९-२० | अंदाजपत्रक २०२०-२१ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | % (टक्के) |
| I | प्रारंभीची शिल्लक | १६,२५,००,००० | १६,२५,००,००० | २.२२% | ०.००% |
| १ | देणगीव्दारे मिळणारी अपेक्षित जमा | ४,७०,३३,६५,००० | ४,८८,०३,५०,००० | ६६.६८% | ३.७६% |
| २ | अपेक्षित महसुली जमा | २,२८,६८,४९,५०० | २,४३,९१,००,००० | ३३.३२% | ६.६६% |
| II | एकूण जमा (१+२) :- | ६,९९,०२,१४,५०० | ७,३१,९४,५०,००० | १००.००% | ४.७१% |
| III | अपेक्षित निर्गतवणूक | ५,४३,८९,४०,००० | ९,६५,०३,१६,००० | ५६.३३% | ७७.४३% |
| | एकूण अपेक्षित जमा (I+II+III) :- | १२,५९,१६,५४,५०० | १७,१३,२२,६६,००० | १००.००% | ३६.०६% |

II. संस्थान (रुग्णालये वगळुन) खर्चाचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)

| अं. क्र. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१९-२० | अंदाजपत्रक २०२०-२१ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | % (टक्के) |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | ६,९१,५२,०६,८०० | ७,५६,५१,१६,००० | ४४.५५% | ९.४०% |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | १,२९,८९,६४,००० | १,५६,३२,३९,००० | ९.२१% | २०.३५% |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | १,९५,५९,७०० | २,२४,२८,००० | ०.१३% | १४.६६% |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | ३,२२,५४,४३,५०० | ६,८६,८७,४०,००० | ४०.४५% | ११२.९५ % |
| ५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | ९६,९९,८०,५०० | ९६,२२,४३,००० | ५.६७% | -०.८०% |
| I | एकूण खर्च (१ ते ५) :- | १२,४२,९१,५४,५०० | १६,९८,१७,६६,००० | १००.००% | ३६.६३% |
| II | अंतिम शिल्लक | १६,२५,००,००० | १५,०५,००,००० | ०.८८% | १५.००% |
| | एकूण अपेक्षित खर्च (I+II) :- | १२,५९,१६,५४,५०० | १७,१३,२२,६६,००० | १००.००% | १३.००% |

**ब)** I. रुग्णालय विभाग जमेचे अंदाजपत्रक *(आकडे रुपयांत)*

| अं. क्र. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१९-२० | अंदाजपत्रक २०२०-२१ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | (टक्के) |
| I | प्रारंभीची शिल्लक | २२,००,००० | २२,००,००० | ०.११% | ०.००% |
| II | अपेक्षित महसुली जमा | ८४,५०,००,००० | ८५,००,००,००० | ४१.७४% | ०.५९% |
| III | संस्थानकडुन वर्ग (तुट) | ९२,८५,८९,८०० | १,१८,४०,५६,००० | ५८.१५% | २७.५१% |
| | एकूण अपेक्षित जमा (I+II+III) :- | १,७७,५७,८९,८०० | २,०३,६२,५६,००० | १००.००% | **१४.६७%** |

II. रुग्णालय विभाग खर्चाचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)

| अं. क्र. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१९-२० | अंदाजपत्रक २०२०-२१ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | (टक्के) |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | १९,१४,५२,८०० | २०,४०,००,००० | १०.०३% | ६.५५% |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | १,००,५७,८०,००० | १,०६,८९,५४,००० | ५२.५५% | ६.२८% |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | १२,३५,००० | १२,६०,००० | ०.०६% | २.०२% |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | ५७,५१,२२,००० | ७५,९८,४२,००० | ३७.३६% | ३२.१२% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| I | एकूण खर्च (१ ते ४) :- | १,७७,३५,८९,८०० | २,०३,४०,५६,००० | १००.००% | १४.६९% |
| II | अंतिम शिल्लक | २२,००,००० | २२,००,००० | ०.११% | ०.००% |
| | एकूण अपेक्षित खर्च (I+II) :- | १,७७,५७,८९,८०० | २,०३,६२,५६,००० | १००.००% | १४.६७% |

ब) अधिनियम २००४ चे कलम २२(२) मधील तरतुदींनुसार,"व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्थापन निधितून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधित जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल." उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधितून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २०१९-२० या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधितून होणारा संभाव्य खर्च या तरतुदीच्या अधिन राहून करता येईल. सन २०१९-२० व २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधीतुन अपेक्षित वाढीव खर्च झाल्यास शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

क) संस्थानच्या विविध विभागांमार्फत साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या पायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळणाच्या विविध सोयी उपलब्ध करून देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान शीर्षाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शीर्षाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे.

ख) मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१चे कलम १०(२३)(सी) ५मधिल तरतुदीमध्ये पाच वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे. मागील वर्षातील अखर्चित उत्पन्न पुढीलप्रमाणे.

| अ.नं. | आर्थिक वर्ष | शिल्लक अखर्चित रक्कम (रुपये) | खर्च करावयाची अंतिम मुदत |
|---|---|---|---|
| ०१ | २०१४-१५ | २३०,८४,२६,८४३/- | ३१.३.२०२० |
| ०२ | २०१५-१६ | २२४,५५,८९,३७७/- | ३१.३.२०२१ |

या अखर्चित उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील पाच वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठया प्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये वाढ झालेली दिसत आहे.

तथापि चालू वर्षाच्या उत्पन्नाच्या ८५ % खर्च व अखर्चित उत्पन्नाचे खर्चाचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे सदरचे अखर्चित उत्पन्न वेळेत खर्च न केल्यास त्यावर आयकर लागु होऊन तो भरणे क्रम प्राप्त होईल, अशा आयकराची रक्कमही मोठी असेल. तरी कृपया याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट "अ" व "ब" म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी संस्थानचे रुग्णालय विभागासह सन २०२०-२१या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मूळ अंदाजपत्रक व सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक मान्यतेस्तव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीच्या सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालय विभागासह सन २०२०-२१या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मूळ अंदाजपत्रक व सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.०९** **Microsoft Licenses खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Cloudstrats Technologies Pvt.Ltd., Mumbai यांनी देऊ केलेल्या निम्नत्तम दरांबाबत चर्चा होऊन त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.१०** **मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ, कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांची टोन्ड गाय दुध दरामध्ये वाढ मिळणेचे मागणीबाबत.**

**निर्णय क्र.९१** **उपरोक्त विषय नं.०९ व १० या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.११** **सन-२०२० चे साईलिला व्दैमासिके मराठी व हिंदी-इंग्रजी तसेच वितरणकामी पाकीटे छपाई करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील निम्नतम दर निश्चीत तसेच निम्नतम दरधारकांस कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतुद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये " श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील,"अशी तरतूद आहे.

मा.तदर्थ समिती सभा निर्णयः-

१) मा.तदर्थ समिती दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३६.

सन-२०२० साठी ०६ साईलिला अंक (द्वैमासिके) मराठी व व हिंदी-इंग्रजी व वितरणकामी पाकीटे छपाई करून घेणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.३१,७६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रास्तविक –सन-२०२० चे साईलिला मराठी व हिंदी-इंग्रजीद्वैमासिके तसेच वितरणकामी पाकीटे छपाईसाठी मा.तदर्थ समिती दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३६ नुसार रू. ३१,७६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार साईलिला द्वैमासिके छपाई करणेसाठी दि.०८.०१.२०२० ते दि.२०.०१.२०२० या कालावधीत Online ई-निविदा मागविणेत आलेल्या आहेत. यामध्ये एकूण १० निविदाधारकांनी सहभाग नोंदविलेला आहे.

सदरील ई-निविदेचे Technical Bid दि.२४.०१.२०२० रोजी उघडणेत आलेले असून त्यात भाग घेतलेल्या एकूण १ निविदाधारकांचे कागदपत्रांची छाननी केली असता त्यातील पात्र/अपात्र निविदाकारांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १. | मे.गणेश आर्टस प्रिंन्टर्स, अ, नगर. | पात्र |
| २. | मे.हिरा प्रिन्ट सोलू. प्रा.लि.मुंबई | पात्र |
| ३. | मे.किंग ऑफ किंगस् प्रिंन्टर प्रा.लि.मुंबई | पात्र |
| ४. | मे.मधुरा प्रिंन्ट सोलू.प्रा.लि.नाशिक | पात्र |
| ५. | मे.ममता ऑफसेट, अ.नगर | पात्र |
| ६. | मे.प्रिंन्ट प्लस प्रा.लि.मुंबई | पात्र |
| ७. | मे.सॅप प्रिन्ट सोल्युशन प्रा.लि,मुंबई | पात्र |
| ८. | मे.सोहेल एन्टरप्रायजेस, मुंबई | पात्र |
| ९. | मे.टॅको व्हिजन प्रा.लि.मुंबई | पात्र |
| १०. | में.युनिटी प्रिंन्टींग प्रेस, मुंबई | पात्र |

मा.खरेदी समितीचे दि.२९.०१.२०२० रोजीचे सभेत सदरील ई-निविदेचे Commercial Bid उघडणेत आले असता, त्यामध्ये प्राप्त झालेल्या न्युनतम दराचा तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ३२ +४ = ३६ पाने ०५ अंक -२०२० | श्री साईलिला द्वैमासिके –हिंदी-इंग्रजी ३२ +४ = ३६ पाने ०५ अंक -२०२० | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०२० | श्री साईलिला द्वैमासिके –हिंदी-इंग्रजी ६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०२० | साईलिला अंक मराठी पाकीटे | साईलिला अंक हिंदी-इंग्रजी पाकीटे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या | ३५,००० | ७७,५०० | ७,००० | १५,५०० | ४२,००० | ९३,००० |
| ०१ | मे.ममता ऑफसेट, अहमदनगर | १५.४५ | १४.४५ | २७.९५ | २५.४५ | १.८० | १.७६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | मे.सॅप प्रिन्ट सोलूशन प्रा.लि, मुंबई | १५.४२ | १३.९४ | २६.८६ | २३.९० | १.५२ | १.५२ |
| ०३ | मे.सोहेल एन्टरप्रायजेस.मुंबई | १५.७५ | १४.५० | २७.०० | २५.०० | **०.९७** | **०.९५** |
| ०४ | मे.युनिटी प्रिन्टींग प्रेस, मुंबई | २२.७० | १९.५० | ३९.८० | ३४.८० | १.५५ | १.४० |
| ०५ | मे.प्रिंन्ट प्लस प्रा.लि.मुंबई | १५.२५ | १४.५० | २७.१५ | २५.२५ | १.४० | १.४० |
| ०६ | मे.मधुरा प्रिन्ट सोल्युशन प्रा.लि . अंबड, नाशिक | १४.९३ | १३.९६ | २६.३५ | २४.९२ | १.१७ | १.११ |
| ०७ | मे.किंग ऑफ किंगस् प्रिंटर प्रा.लि. मुंबई | १७.६४ | १५.४० | ३०.२४ | २५.७६ | १.९५ | १.९५ |
| ०८ | मे.हिरा प्रिंन्ट सोलूशन, मुंबई | १४.०० | **१२.००** | **१५.५०** | **१७.५०** | १.१० | १.१० |
| ०९ | मे.गणेश आर्ट प्रिंटर्स, अहमदनगर | **१३.२५** | १२.२५ | २३.२५ | २१.२५ | १.५० | १.३५ |
| १० | मे.टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई | १५.१० | १३.८५ | २५.८५ | २३.९५ | १.४० | १.३० |

प्रास्तविकात नमूद केलेल्या तक्त्यात प्राप्त झालेल्या दहा निविदाधारकांपैकी मे.गणेश आर्टस् प्रिंटर्स, अहमदनगर यांचे साईलिला द्वैमासिके- मराठी [३२ + ४ = ३६पाने - (०५ अंक)], मे.हिरा प्रिंन्ट सोलू.प्रा.लि.मुंबई यांचे श्री साईलिला द्वैमासिके- हिंदी-इंग्रजी [३२ + ४ = ३६पाने - (०५ अंक)], साईलिला द्वैमासिके- मराठी [६४ + ४ = ६८पाने - (०१ अंक)] व श्री साईलिला द्वैमासिके- हिंदी-इंग्रजी [६४ + ४ = ६८पाने - (०१ अंक)]तसेच मे.सोहेल एन्टरप्रायजेस, मुंबई यांचे साईलिला द्वैमासिके मराठी पाकीटे व साईलिला द्वैमासिके हिंदी-इंग्रजी पाकीटे छपाईकामीचे दर न्युनतम आहेत. सदरचे दर गडद व अधोरेखित केलेले आहेत.Item wise न्युनतम दर असलेल्या निविदाधारकांना मा.तदर्थ समितीचे सभेत चर्चा वाटाघाटीसाठी बोलावून चर्चेत निम्नत्तम दर निश्चित करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी विभागाच्या अभिप्रायात नमूद केलेप्रमाणे मा.तदर्थ समितीचे सभेत निम्नतम दरधारकांस चर्चा वाटाघाटीसाठी बोलावून चर्चेत निम्नत्तम दर निश्चित करणेसाठी सदर विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत आयत्या वेळचा विषय म्हणून निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०२० चे साईलिला व्दैमासिके मराठी व हिंदी-इंग्रजी तसेच वितरणकामी पाकीटे छपाईकामी निम्नत्तम दरधारकांना चर्चेसाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.१२** **निळवंडे धरण उध्दव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान,शिर्डी , नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगाव नगरपरिषद संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.२ चे कामाबाबत.**

**विषय नं.१३** **"श्री रामनवमी उत्सव-२०२०" मध्ये दि.०१.०४.२०२० ते दि.०३.०४.२०२० अखेर श्री साई मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करणेस व देखावा उभारणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत.**

| | |
|---|---|
| **विषय नं.१४** | **व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील प्रत्येक रुममध्ये बसविण्यात येणाऱ्या ए.सी.तसेच टि.व्ही.संचाकरीता वायरींग काम करणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील न्युनतम दर निवीदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी होऊन निर्णय होणेबाबत.** |
| **विषय नं.१५** | **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical Substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकनात ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पुर्व कोपऱ्यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं.२/४,३/१ व ३/७ मधील १२७५ चौ.मिटर जागा ठेकेदार यांना उपलब्ध करुन देणेबाबत तसेच कनेक्टींग कॉरीडॉरचे कामासाठी सध्या कार्यरत असलेला Electrical Transformer स्थलांतरीत करणेबाबत.** |
| **विषय नं.१६** | **स्ट्रीट लाईट मेंटेनन्सकरीता ॲल्युमिनियम टिल्टेबल टॉवर एक्सटेंशन लँडर व ॲल्युमिनियम सेल्फ सपोर्टी एक्सटेंशन लँडर खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास तसेच दरपत्रके मागविणे, संस्थानचे वेबसाईटवर दरपत्रक नोटीस प्रसारीत करणेबाबत .(अपेक्षीत खर्च रक्कम रु.२,८०,०००/-)** |
| **विषय नं.१७** | **नव्याने बांधकाम करणेत आलेले शैचालयाचे 'पे ॲन्ड युज' तत्वावर चालविणेस देणेबाबत.** |
| **विषय नं.१८** | **मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्यापासून तयार करणेत येणाऱ्या अगरबत्ती पाकीटावर संस्थानचे नावाचा उल्लेख करणेबाबत.** |
| **विषय नं.१९** | **दि.१४.०३.२०२० ते दि.२३.०३.२०२० अखेर होणाऱ्या डॉ.सुभाष पाळेकर गुरुजी यांच्या नैसर्गीक शेती विषयक शिबीरासाठी साईआश्रम भकतनिवास विभागातील खोल्या व शताब्दी मंडप आरक्षित करुन ठेवणेबाबत.** |
| **विषय नं.२०** | **संस्थानचे कर्मचारी गणवेश कापड खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.** |
| **विषय नं.२१** | **संस्थानला माहे जुलै २०१९ ते सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तूप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत.** |
| **विषय नं.२२** | **साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणी वाटप काम करत असलेले २८ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत.** |
| **निर्णय क्र.९३** | **उपरोक्त विषय नं.१२ ते २२ या विषयांवरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** |

---

**विषय नं.२३** **श्रींचे समाधीचे वरील बाजुकडील असलेल्या सोन्याचे कठडयाचे तसेच पादुकांचे बाजुचे असलेले सोन्याचे कठडयाचे डागडुजीकरणाचे काम तसेच बाबांचे सिंहासना खालील उर्वरीत भागास (मार्बलला) नव्याने सोन्याचे आवरण बसविणेचे काम देणगी स्वरुपात करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.११, निर्णय क्र.५२९ "यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर, डायरेक्टर फायनान्स, हेटरो ग्रृप ऑफ कंपनीज, है.बाद यांचेकडून श्रींचे समाधी मंदिरातील समाधीचे व पादुकांचे बाजुला असलेल्या चांदीच्या पट्टीवर देणगीदाखल सोन्याचा पत्रा बसवून घेण्यास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना–सध्याचे श्रींचे समाधीचे वरील बाजुकडील असलेल्या सोन्याचे कडठयांवर तसेच श्रींचे पादुकांचे बाजुचे असलेले सोन्याचे कठडयांवर सोने बसवून देण्याचे काम हे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.११, निर्णय क्र.५२९ अन्वये देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, हैद्रबाद यांनी देणगी स्वरुपात करुन दिलेले आहे.

आता सदरहू कठडयाचे बाबांचे स्नानाचे पाणी जाऊन तसेच दैनंदिन साफसफाई / वापरामुळे काही ठिकाणी सोन्याचा पत्रा निघुन खराब झालेला आहे. त्याबाबत साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, है.बाद यांनी सदरहू दैनंदिन वापरामुळे खराब झालेले श्रींचे समाधीचे बाजुकडील कठडयाचे व श्रींचे पादुकांचे बाजुचे सोन्याचे कठडयांचे डागडुजीकरणाचे काम तसेच बाबांचे सिंहासनाखालील उर्वरीत भागास (मार्बलवर) सोन्याचे आवरण बसविणे हे काम देणगी स्वरुपात करण्यास परवानगी मागितलेली आहे. (सोबत देणगीदार यांनी करावयाच्या कामाचा फोटो जोडलेला आहे.)

विभागाचा अभिप्राय- यापुर्वी उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.११, निर्णय क्र.५२९ अन्वये समाधी मंदिरातील श्रींचे समाधी भिंतींना, खाबांना व समाधीचे चौथ-याला सोन्याचा मुलामा करण्याचे काम तसेच बाबांचे सोन्याचे सिंहासन तयार करण्याचे काम देणगी स्वरुपात करण्यात आलेले आहे. तदनंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी समाधी चौथ-याचे खालील खराब झालेल्या भागाची डागडुजी

अथवा नुतनीकरण करणेबाबत निर्देश दिलेले दिलेनुसार दि.१२/१२/२०१९ ते दि.१४/१२/२०१९ या कालावधीत यापुर्वीचे देणगीदार साईभक्त श्री.बी.विजयकुमार, है.बाद यांचेमार्फत देणगी स्वरुपात करण्यात आलेले आहे.

तसेच श्रींचे समाधीचे बाजुकडील व पादुकांचे बाजुकडील सोन्याचा कठडा बाबांचे स्नानाचे पाणी जाऊन तसेच दैनंदिन वापरामुळे खराब झालेला आहे. साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी यांनी दि.०६/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये सदरहू सोन्याचे कठडयांचे डागडुजीकरण करुन देण्यास तसेच बाबांचे सिंहासना खालील उर्वरीत भागास (मार्बलला) नव्याने सोन्याचे आवरण देणगी स्वरुपात बसवून देण्यास सहमती दर्शविलेली आहे. देणगीदार साईभक्त यांनीच यापुर्वी सदरचे काम देणगी स्वरुपात करुन दिलेले असल्याने, त्यांचेकडूनच सदरचे डागडुजीकरणाचे काम देणगी स्वरुपात करुन घेता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी श्रींचे समाधीचे बाजुकडील व पादुकांचे बाजुकडील सोन्याचा कठडयाचे डागडुजीकरणाचे काम तसेच बाबांचे सिंहासना खालील उर्वरीत भागास (मार्बलला) नव्याने सोन्याचे आवरण बसविणेकामी यापुर्वीचेच देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, डायरेक्टर, हेटरो ड्रग्स लिमि., है.बाद यांचेकडून देणगी स्वरुपात करुन घेणेबाबत सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचे काम यापुर्वीचे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, डायरेक्टर, हेटरो ड्रग्स लि., हैद्राबाद हे देणगी स्वरुपात करुन देणार असुन त्याकरीता संस्थानला खर्च करावा लागणार नाही, त्यामुळे श्रींचे समाधीचे बाजुकडील व पादुकांचे बाजुकडील सोन्याचा कठडयाचे डागडुजीकरणाचे काम तसेच बाबांचे सिंहासना खालील उर्वरीत भागास (मार्बलला) नव्याने सोन्याचे आवरण बसविणेकामी यापुर्वीचेच देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, डायरेक्टर, हेटरो ड्रग्स लि., हैद्राबाद यांचेकडून देणगी स्वरुपात करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. तसेच त्यांनी केलेल्या कामाची संस्थानचे पॅनलवरील सोनारांकडून पडताळणी करुन घेण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.२४** **रविवार दि.२१ जुन,२०२० रोजी सुर्यग्रहण असल्याने मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणेबाबत.**

**विषय नं.२५** **दर्शन/आरती पासेसचे देणगी शुल्कात वाढ करणेबाबत.**

**विषय नं.२६** **श्रींचे मंदिरात व व्दारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचे वेळी, पालखी मिरवणूकीसाठी तसेच संस्थानचे उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थित असणाऱ्या स्थानिक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करणेबाबत.**

**विषय नं.२७** **श्री.रघुनाथ भागाजी आहेर, उपकार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग यांना देणेत आलेल्या कारणे दाखवा नोटीसीचे दि.११.०१.२०२० रोजीचे खुलाशाबाबत.**

**विषय नं.२८** **श्री.एम.बी.गायकवाड,सहाय्यक अभियंता श्रेणी-१, गोदावरी उजवा तट कालवा, उपविभाग राहाता यांना निवासासाठी संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेबाबत.**

**विषय नं.२९** **शैक्षणिक वर्ष-२०२०-२०२१ करीता ज्युनियर केजी वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेस व ज्युनियर केजी वर्गासाठी मर्यादीत एकुण २५० प्रवेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.३०** **शैक्षणिक वर्ष जुन २०१५ पासून ते मे २०२० अखेर इयत्ता १ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ (RTE Act,2009) अन्वये एकुण दिलेले मोफत प्रवेश व जिल्हा परिषद शासनाकडून शाळेला येणे असलेल्या एकुण शुल्क प्रतिपुर्ती तपशिलाबाबत.**

**विषय नं.३१** **सन २०१९-२०२० शैक्षणिक वर्षात शालेय व स्कुलबस शुल्कात १० टक्के वाढीबाबत.**

**विषय नं.३२** **विविध टेलीकॉम कंपन्यांचे प्रिपेड मोबाईल सेवेबाबत प्राप्त झालेल्या दरास अनुसरुन व गठीत समितीचे अहवालास अनुसरुन शासन नियुक्त अधिकारी तसेच संस्थान अधिकारी/कर्मचारी यांची वर्गवारी निश्चित करुन त्यांना त्यांचे मासीक पगारात टेलीफोन अलौंन्स रक्कम देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.९५** **उपरोक्त विषय नं.२४ ते ३२ या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.३३** **श्री साई प्रसादालयात सध्या काम करत असलेले चपाती/पुरी ठेकेदार व मशिनवर चपाती तयार करणेकामी असलेले ठेकेदार यांना ई-निविदा प्रक्रिया होईपावेतो मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम १४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

प्रास्तविक :- वरील विषयास अनुसरुन,मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णयानूसार, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये मनुष्यबळाव्दारे स्वामी नारायण चपाती/पुरी तयार करणेकामी यशोधरा महिला सह.औदयोगिक उत्पा.संस्था, नाशिक यांना दि.०१/०३/२०१९ ते २९/०२/२०२० या ०१ वर्ष कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा गहु आटा+ मैदयास कर (GST) वगळून रुपये १३०४/- (अक्षरी रु.एक हजार तीनशे चार मात्र) याप्रमाणे कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे . त्याचप्रमाणे श्री साई प्रसादालयात तीन चपाती मशिन कार्यरत असून, सदर चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणेकामीयशोधरा महिला सह.औदयोगिक उत्पा.संस्था, नाशिक यांना दि.०१/०३/२०१९ ते २९/०२/२०२० या ०१ वर्ष कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा गहु आटा+ मैदयास कर (GST) वगळून रुपये २७८/- (अक्षरी रु.दोनशे अठ्याहत्तर मात्र) याप्रमाणे कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे .

उपरोक्त चपाती/पुरी तयार करणे व मशिनवर चपाती तयार करणेकामी असलेल्या ठेकेदारांची मुदत दि.२९ फेब्रुवारी २०१९ अखेर संपुष्टात येत आहेची गैरसोय होऊ नयेमुळे भक्तांत्या ., याकरीता पुढील कालावधीसाठी ईनिविदा प्रक्रिया सुरु करणे-स व त्याकामी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव चार महिने अगोदर म्हणजेच दि.०५/०९/२०१९ रोजी सभा कामकाज विभागाकडे सादर करणेत आलेला होता. परंतू दि.०५/०९/२०१९ रोजीनंतर मा.व्यवस्थापन समिती सभेत कुठलेही विषयावर निर्णय झाले नाही. त्यानंतरचे काळात महाराष्ट्र विधानसभा निवडणूकींचा प्रोग्राम निश्चित होवून आदर्श आचारसंहीता लागू झाली. त्यामुळे माहे स्प्टेंबर व ऑक्टोबर-२०१९ या दोन महिन्यात सदरचे प्रस्तावावर निर्णय झाला नाही. तदनंतर दि.०७ नोव्हेंबर-२०१९ रोजी मा.व्यवस्थापन समिती सभेची मिटींग लागली परंतू सदरची सभा देखील काही अपरिहार्य कारणांमुळे रद्द झाली.

तदनंतर मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे आदेशानूसार मा.तदर्थ समितीची नेमणूक करणेत आली. त्यानूसार भक्तांची प्रसादभोजनाअभावी गैरसोय होऊ नये, याकरीता पुढील कालावधीसाठी ई-निविदा सुरु करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समिती दि.०४/१२/२०२० रोजीचे सभेत सादर करणेत आला व त्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानंतर पुन्हा मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे पिटीशन दाखल करणेत येवून सदरचे खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. ही सर्व कार्यवाही होणेसाठी जवळपास दीड महिन्याचा कालावधी गेलेला आहे. तोपर्यंत सदरहु कार्यवाही होईपावेतो इकडील विभागामार्फतई-निविदा मसुदा तयार करुन तो मसुदा विधी विभाग व "निविदा दस्तऐवज तपासणी" समितीकडून तपासूनकायम करणेत येवून वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन अंतिम निविदा भरणेसाठी विहीत कालावधी दि.०६/०२/२०२० पर्यंत फक्त दोनच ई-निविदा आल्याने, शासकीय नियमानूसार तीन ई-निविदा असणे गरजेचे असल्याने निविदा भरणेकामी पुन्हा दि.१५/०२/२०२० रोजीपर्यंत कामाचे ०७ दिवसांचा कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरहु मुदतवाढ कालावधीपर्यंत दोनच निविदा राहील्या तर पुन्हा दुस-यांदा मुदतवाढ दयावी लागेल असे नम्र मत आहे. तदनंतर पुढील प्रक्रीया पुर्ण करुन कार्यादेश देणेसाठी साधारणतः एक ते दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

त्यामुळे सध्या श्री साई प्रसादालयात प्रसादभोजनामध्ये मनुष्यबळाव्दारे स्वामी नारायण चपाती/पुरी तयार करणे व मशिनवर मुनष्यबळ पुरवून चपाती तयार करणेकामी सध्या असलेले ठेकेदार यांना करारनामातील अटी/शर्तीनूसार, चालू कामाकरीता सुरु असलेली र्यादेश निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नवीन ठेकेदारास का देईपावेतो, आहे त्याच मंजूर दराने मुदतवाढ देता येईल असे आहे. त्यानूसार दोन्ही कामासाठी महिन्याकाठी अंदाजे रु.७,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता मिळावी असे नम्र मत आहे .

मागणी:- श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणे तसेच चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी असलेले सध्याचे ठेकेदारांना,प्रसादभोजनातील चपाती अभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता ई-निविदाची प्रक्रिया पुर्ण होवून पात्र ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच अटी/शर्तीवर व केलेल्या करारनाम्यानूसार संबंधीत ठेकेदार यशोधरा महिला सह.औदयोगिक उत्पा.संस्था, नाशिक यांना स्वामी नारायण चपाती/पुरी तयार करणे तसेच चपाती मशिनवर चपाती तयार करणे या दोन्ही कामासाठी दोन महिने अथवा नवीन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी

मुदतवाढ दयावी लागेल. असे इकडील विभागाचे नम्र मत आहे. त्यासाठी सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.तदर्थ समिति सभेत सादर करणे गरजेचे आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- तरी उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, श्री साई प्रसादालयामध्ये मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी व चपाती मशिनवर चपाती तयार करणे या दोन्ही कामांसाठी सध्या काम करत असलेले ठेकेदार,यशोधरा महिला सह.औदयोगिक उत्पा.संस्था, नाशिक यांना प्रसादभोजनातील चपाती अभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता दोन महिने अथवा ई-निविदाची प्रक्रिया पुर्ण होवून पात्र ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता आहे त्याच मंजूर दरात अटी/शर्तीवर व केलेल्याकरारनाम्यानूसार मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामध्ये मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी व चपाती मशिनवर चपाती तयार करणे या दोन्ही कामांसाठी सध्या काम करत असलेले ठेकेदार,यशोधरा महिला सह.औदयोगिक उत्पा.संस्था, नाशिक यांना प्रसाद भोजनातील चपाती अभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता दि.३१ मार्च,२०२० पर्यंत आहे त्याच मंजूर दरात अटी/शर्तीवर व केलेल्याकरारनाम्यानूसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.३४** **श्री साईनाथ रुग्णालयातील मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीराचे आयोजन करणेस व येणाऱ्या रक्कम रु.१,००,०००/-अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद–कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र.– नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक –श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांची सेवा करणेच्या अनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालय विभागाने मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीर आयोजन करणेचा मानस व्यक्त केला आहे. तरी या निमित्त दि. २७ ते २८ मार्च २०२० या कालावधीत शिरडी येथे सदरहु शिबीर घेणेचे नियोजन आहे. मोफत श्रवणयंत्र शिबीरासाठी New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली च्या वतीने मोफत ३०० नग पॉकेट साईज हिंअरींग मशिन व २०० नग बलु टुथ हिअरींग मशिन असे एकुण ५०० नग हिअरींग ऍड मशिन मोफत कर्णबधीर रुग्णांना ऑडीओमेट्री तपासणी करण्यात येवुन योग्य रित्या Frequency सेट करुन देण्यात येणार आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांची ऑडीओमेट्री तपासणी करणेकामी New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली च्या वतीने दोन कुशल तज्ञ ऑडीओलॉजिस्ट सदर कंपनीमार्फत मोफत येणार आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयातील कान, नाक, घसा विभागातील वैद्यकिय अधिकारी डॉ. शोभना कोल्हे, डॉ. अमोल जोशी, डॉ. योगेश गेठे, डॉ. गौरव रॉय व डॉ. शिरीष शेळके सदर शिबीरात सहभाग नोंदविणार आहेत.

तसेच अशा प्रकारचे पॉकेट मॉडेल ऑडीओमेट्री मशिन ही सुमारे २,५००/- व ब्लु टुथ हिअरींग ऑडीओमेट्री मशिन ही सुमारे ६,०००/- रुपये किमतीचे खाजगी रुग्णालयात अंदाजे आकारणी करण्यात येते. तसेच कर्णबधीर रुग्णांना ऑडीओमेट्री तपासणी करणेकामी खाजगी रुग्णालयात सुमारे रु. ५००/- इतका दर आकारला जातो.

New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली च्या देणेत येणा-या हिअरींग एड मशिन करीता सदर कंपनीकडुन खालीलप्रमाणे खर्च करणेत येईल.

१) पॉकेट साईज हिंअरींग मशिन ३०० नग X रु. २,५००/- =रु. ७,५०,०००/-

२) बलु टुथ हिअरींग मशिन २०० नग X रु. ४,०००/- = रु. ८,००,०००/-

३) कर्णबधीर रुग्णांना ऑडीओमेट्री तपासणी ५०० X रु. ५००/- = रु. २,५०,०००/-

-----------------------

एकुण = रु. १८,००,०००/-

सदर मशिन खरेदीकामी खाजगी रुग्णालयात अतिरिक्त दर लागत असलेमुळे ग्रामीण भागातील रुग्ण अशा प्रकारच्या हिअरींग एड मशिन घेण्यापासुन वंचित राहतात. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात अशा प्रकारचे मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीराचे आयोजीत करणे बाबत मानस व्यक्त केलेला आहे. ज्यामुळे जास्तीत जास्त गरीब व गरजु रुग्णांना याचा फायदा होईल. New Sound Hearing Aid Pvt. Ltd.,

दिल्ली च्या वतीने श्री साईबाबा संस्थान बरोबर यापुर्वी देखील ०९ ते १० ऑगस्ट २०१९ रोजी मोफत हिअरींग ऍ़ड मशिन वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरात एकुण ३०० रुग्णांना श्रवणयंत्र वाटप करणेत आले होते. या शिबीरात किमान ५०० रुग्णांना लाभ देण्याचा मानस सदर कंपनीने दर्शविलेला आहे. सदर शिबीराकरीता संस्थानच्या इतर विभागाकडुन शिबीरासाठी लागणा-या अनुषंगीक बाबींची देखील पुर्तता होणे आवश्यक आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय - दि. २७ ते २८ मार्च २०२० रोजी मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागांमार्फत कार्यवाही होणे तसेच येणा-या सर्व अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच येणारे तज्ञ ऑडीओलॉजिस्ट व इतर टीम यांच्या राहण्याची, जेवणाची, दर्शन, आरतीचीव इतर अनुषंगीक गोष्टींची व्यवस्था शिबीराच्या एक दिवस आगोदर व एक दिवस नंतर असे दि. २६ ते २९ मार्च २०२० अखेर कालावधीत करण्याची आवश्यकता आहे.

| अ.नं | विभाग | करावयाचे कामाचे तपशिल<br>(दि. २७ ते २८ मार्च २०२०) | अंदाजे खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | शिबीराकरीता श्री साईनाथ रुग्णालयाच्या उत्तर बाजुस असलेल्या इमारतीस शेडला चारही बाजुने कनात लावुन मिळणे. | १०,०००/- |
| ०२ | प्रकाशने विभाग | तंत्रज्ञ तथा मान्यवर यांच्याकरीता मोफत श्रींचे ३ डी फोटो फ्रेम (१० नग), मराठी साईच्चरित्र (०५ नग), हिंदी साईच्चरित्र (०५ नग) | ५,०००/- |
| ०३ | विद्युत विभाग | शिबीरस्थळी इलेक्ट्रीक पॉईंट, लाईटची व्यवस्था करणे. | - |
| ०४ | कॅटीन विभाग | शिबीर काळात मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्याकरीता मोफत चहा, कॉफी, बिस्कीट व मिनीरल वाटर बॉटल ची आवश्यकतेनुसार व्यवस्था करण्यात यावी. | ५,०००/- |
| ०५ | सि.सि.टी.व्ही. विभाग | उद्धाटन कार्यक्रमासाठी फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगची व्यवस्था | २,०००/- |
| ०६ | वाहन विभाग | मान्यवर तथा तंत्रज्ञ यांच्यामागणीप्रमाणे रुग्णालय मंदीर, प्रसादालय व बाहेरील हॉटेलमध्ये ये-जा करण्यासाठी अथवा विमानतळ, रेल्वे स्टेशन येथे आणणे व सोडण्याकरीता वातानुकुलीत गाडीची व्यवस्था करणे. | २,०००/- |
| ०७ | व्दारावती भक्तनिवास | एकुण ०८तंत्रज्ञ व मान्यवर इतर स्टाफ यांच्याकरीता ०३ वातानुकुलीत रुमची व्यवस्था शिबीर काळात मोफत करण्यात यावी, तसेच शिबीर काळाच्या एक दिवस पुर्व व शिबीर समाप्ती नंतर एक दिवस अतिरीक्त रुमची मोफत व्यवस्था (दि. २६ ते २९ मार्च २०२०) करण्यात यावी. | १०,०००/- |
| ०८ | श्री साईप्रसादालय | १) शिबीर काळात मान्यवर तथा तंत्रज्ञ यांच्यासाठी १०० व्यक्तींकरीता विनामुल्य नाष्टा पुरविणे.<br>२) शिबीरकाळात ५० तंत्रज्ञ व मान्यवर व्यक्तींकरीता भोजनाची व्यवस्था रुग्णालयामध्ये अथवा व्हि.आय.पी. कक्षात (दि. २६ ते २९ मार्च २०२०) मोफत करण्यात यावी. | २०,०००/- |
| ०९ | जनसंपर्क विभाग | आवश्यकते प्रमाणे मान्यवर यांच्यासाठी मोफत श्रींच्या दर्शनाची व्हि.आय.पी. दर्शन व आरतीची व्यवस्था करण्यात यावी | ३,०००/- |
| १० | कामगार विभाग | शिबीरकाळात सकाळ, दुपार, रात्री अतिरिक्त ०३ सुरक्षारक्षक प्रत्येक शिफ्टकामी तसेच ०३ वॉर्डबाय, ०३ आया, ०३ परिचारीका, ०३ परिचारक श्री साईनाथ रुग्णायलात मिळावे. (दि. २७ ते २८ मार्च २०२० रोजी) | १०,०००/- |
| ११ | ध्वनीक्षेपण विभाग | शिबीरस्थळीसाऊड सिस्टीमची व्यवस्था करणेत यावी. (दि. २७ ते २८ मार्च २०२० रोजी) | - |
| १२ | बगीचा विभाग | शिबीरस्थळी शुषोभनासाठी २० कुंडयांची व्यवस्था करण्यात यावी. | - |
| १३ | मंदीर विभाग | मोफत श्रींचे मुर्ती ०३ नग व शिबीर उद्धाटन कार्यक्रमाकरीता श्रींचे पुजा करणेकामी पुजारी सर्व पुजाच्या साहीत्य सह पुरविण्यात यावे. | ३,०००/- |
| १४ | श्री साईनाथ | शिबीरासाठी लागणारे अनुषंगीक किरकोळ खर्चास मान्यता मिळणे बाबत. | ३०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | रुग्णालय | (रांगोळी, फ्लेक्स, फ्लॉवर डेकोरेशन, हॉटेल बिल, पाणी जार, सोफा, टेबल, खुर्ची, पेपरडीश, पत्रावल इत्यादी) | |
| | | **एकुण खर्च** | **१,००,०००/-** |

शिबीर अंदाज पत्रकामध्ये रक्कम रु. १०,००,०००/- वार्षिक मंजुरी देण्यात आलेली असुन सदर रक्कमेमधुन रु. ८,७१,५३३/- इतकी शिल्लक आहे. सदरहु शिबीरापोटी येणा-या रक्कम रु. १,००,०००/- शिबीर अंदाज पत्रकामधुन खर्ची टाकण्यात येवुन करणेत येईल.तरी श्री साईनाथ रुग्णालयात दि. २७ ते २८ मार्च २०२० या कालावधीत मोफत श्रवण यंत्रवाटप शिबीर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करणेस व येणा-या रु. १,००,०००/- इतक्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात दि. २७ ते २८ मार्च २०२० या कालावधीत मोफत श्रवण यंत्रवाटप शिबीर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व New Sound Hearing Aid Pvt. Ltd., दिल्ली यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करणेस व याकामी येणा-या रु. १,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३५** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे आक्टोंबर-२०१९ ते डिसेंबर-२०१९ अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.४,००,०१,६८५/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.३६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता Indian कंपनीचे Instrument खरेदीकामी रु.११,२६,८३७/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.३७** **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT I & II या विभागांकरीता Imported कंपनीचे Instrument खरेदीकामी रु.१,१२,०९,१५५/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.३८** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागांकरीता हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदीकामी रु.१६,५४,०४६/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.३९** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.७,०२,६१६/-मात्र आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**विषय नं.४०** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर-२०१९ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८८,६०,७६०/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४१** **श्री साईनाथ रुग्णालयातील फिमेल मेडीकल वार्डकरीता (5 Parameters) Modular Multipara Monitor खरेदीकामी रु.९,५०,०००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४२** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता Syringe Pump खरेदीकामी रु.५,७५,४००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदी करणेकामी निम्नतम दरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

**विषय नं.४४** **रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजिनिअरींग विभागाकरीता अत्यावश्यक कर्मचारी भरणेबाबत बायोमेडीकल विभागाचे दि.१४.०९.२०१९ रोजीचे पत्राबाबत.**

**विषय नं.४५** **सध्याचे वेतनात वाढ व वाढीव मिळालेल्या वेतनात दरवर्षी वाढ होणेसाठी ठेकेदारामार्फत कार्यरत फिजिओथेरपिस्ट यांचे दि.२८.१२.२०१९ रोजीचे अर्जाबाबत.**

**विषय नं.४६** **दोन्ही रुग्णालयासाठी देणगीदाखल घेण्यात येणारी संगणक प्रणाली रद्द करुन, नव्याने कार्यवाही सुरु करणेबाबत.**

**विषय नं.४७** **श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. विभागाकरीता C-Arm Machine with Accessories खरेदीकामी रु.४८,१६,२८२/-चे खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४८** **श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S.-1 विभागांकरीता Modular Multiparameter (Cardiac) खरेदीकामी रु.१४,३४,९०२/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९८** **उपरोक्त विषय नं.३५ ते ४८ या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

---

**यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयांवर निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **दिनांक ०६.०२.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.९९** **दिनांक ०६.०२.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२**
**निर्णय क्र.१००** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सदस्य तथा अतिरिक्त महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी सभेत मुद्दा उपस्थित केला की, मा. प्रमुख जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी तदर्थ (Ad-hoc) समितीचे सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.०४.०१.२०२० चे दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये ५८८ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत सामाऊन घेऊन नियमित नेमणूक आदेश दिल्याबाबतचे जे वृत्त प्रसिध्द झाले त्या विषयाचे संदर्भात दि.०६ जानेवारी,२०२० चे जे पत्र दिले त्याविषयी चर्चा करावी.**

**यावर चर्चा होऊन, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे बैठकीमध्ये सदरचे विषयासंबधी सविस्तर माहिती द्यावी,असे ठरले. सदरचा विषय दि.२४.०२.२०२० चे सभेच्या अजेंडयावर घेण्यात यावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

वरील निर्णय क्र.८९ ते १०० सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०२.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

**स्वाक्षरीत/-**
**(श्रीमती गिता पी.बनकर)**
**सहा.धर्मादाय आयुक्त,**
**अहमदनगर.**

**स्वाक्षरीत/-**
**(दिलीप स्वामी)**
**अप्पर महसुल विभागीय आयुक्त,**
**नाशिक**

**स्वाक्षरीत/-**
**(दीपक मुगळीकर,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

**स्वाक्षरीत/-**
**(श्रीकांत एल.आणेकर)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,**
**अहमदनगर.**